# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

वर्ष-२ ■ अंक-४ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २९ ऑगस्ट २०२२ ■ पाने-१६ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669



दिवा न्यूज

आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com


## नि:पक्ष भूमिका, विकास पत्रकारिता आणि वाचकांचा प्रतिसाद!

# 'दिवा न्यूज'चे दुसऱ्या वर्षात पदार्पण!




### विशेष संपादकीय

दिवा शहरातून प्रसिद्ध होणारे दिवा न्यूज वर्तमानपत्र दुसऱ्या वर्षात प्रवेश करत आहे. मागील वर्षभरात सकारात्मक आणि विकास पत्रकारिता करताना दिवा न्यूजने आपले सातत्य जपले आहे. वर्तमानपत्र ही समाजाचा आरसा असतात असं आपण नेहमी म्हणतो. आज समाजातील समस्यांचे वास्तव वर्तमानपत्र म्हणून मांडणे आवश्यक बनले आहे. दिवा न्यूज आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाचा आरसा बनू पाहत आहे. दिव्यासारख्या छोट्या शहरातून प्रसिद्ध होणारे दिवा न्यूज हे पहिले वर्तमानपत्र असून हळूहळू या वर्तमानपत्राचा विस्तार ठाणे शहर आणि अन्य भागात होत आहे.

शासन, प्रशासन, महापालिका त्याचबरोबर शासकीय यंत्रणा यांची जबाबदारी आणि नागरिकांची कर्तव्ये याबाबत जनजागृती करण्याची गरज आहे. सक्षम समाज घडवण्यासाठी वर्तमानपत्रांनी यासाठी पुढाकार घ्यायला हवा. येत्या वर्षांमध्ये आम्ही हा संकल्प घेऊन वाचकांपर्यंत पोहोचणार आहोत. स्थानिक वर्तमानपत्र म्हणून वाटचाल करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, मात्र स्थानिक वाचक वर्ग दिवा न्यूजला प्रचंड प्रतिसाद देत असल्याने दर सोमवारी प्रसिद्ध होणारे दिवा न्यूज वर्तमानपत्र आता डिजिटल स्वरूपात सुद्धा वाचकांच्या भेटीला येणार आहे. दिवा न्यूजची वेबसाईट आणि ई-पेपर सुद्धा उपलब्ध असणार आहे. दैनंदिन घडणाऱ्या घडामोडी वाचकांना संकेतस्थळावर वाचायला मिळणार आहेत. दिवा शहरातून प्रसिद्ध होणारे दिवा न्यूज हे वर्तमानपत्र आगामी काळात ठाणे आणि लगतच्या भागांमध्ये पोहोचवण्याचा आमचा मानस असून लोकहितवादी पत्रकारिता दिवा न्यूजच्या माध्यमातून होईल हा विश्वास आम्ही देतो. हितचिंतक, जाहिरातदार, दिवा न्यूज वर्तमानपत्र सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सहकार्य करणारे कर्मचारी, विक्रेते या सर्वांचे प्रथम वर्धापन दिनानिमित्त आम्ही आभार व्यक्त करतो. दिवा शहरातील वाचकांनी अल्पावधीतच या वर्तमानपत्राला प्रतिसाद दिला त्याबद्दल वाचकांना धन्यवाद देतो.

– सुहास खंडागळे, संपादक

### आतील पाने


दिव्याच्या मूलभूत प्रश्नांकडे राजकारणापलीकडे जाऊन पाहण्याची गरज २

दिव्यातील नागरिकांना शहरात बदल झालेला दिसतोय ५

शिंदे साहेबांच्या माध्यमातून दिव्याच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद ६

प्रभागातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य ६

ठाणे शहराच्या विकासासाठी राजकीय नेतृत्व, धोरणात बदल करणे आवश्यक ८

दिवा शहरासाठी निधी येतो तो खर्च कुठे होतो हे नागरिकांना कळणे गरजेचे १०

ठाणे शहराचा नियोजनबद्ध विकास करायचा असेल तर... १४

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१

**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने

**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# दिव्याच्या मूलभूत प्रश्नांबाबत राजकारणापलीकडे जाऊन पाहण्याची गरज



**-ज्योती पाटील**
**अध्यक्षा, महिला मोर्चा**
**दिवा, भाजप**

दिवा शहरातील मूलभूत प्रश्न सोडवायचे असतील तर त्यासाठी मुळात प्रचंड राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे.अनेक वेळा एखाद्या प्रश्नावर आपण आवाज उठवतो तेव्हा सत्ताधारी किंवा प्रशासन त्याकडे जर राजकीय दृष्टिकोनातून पाहत असेल,प्रश्न मांडणारे राजकारण करतात असं त्यांचं म्हणणं असेल तर तो प्रश्न अनेक वर्ष सुटणार नाही. तसेच दिव्याच्या बाबतीत काहीच झाले आहे. आम्ही जेव्हा दिव्याचे प्रश्न मांडतो तेव्हा ते नागरिकांच्या समस्या असतात...नागरिकांनी आमच्याकडे येऊन मांडलेले ते प्रश्न असतात. नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम आम्ही राजकीय पक्ष म्हणून करत असतो. मात्र त्या त्या वेळेला सत्तेत बसलेल्यांना प्रश्न उठवणारे किंवा प्रश्न विचारणारे हे राजकीय दृष्टिकोनातून दिसतात. त्यामुळे त्या प्रश्नांकडे त्या सत्ताधारी लोकांचं दुर्लक्ष होतं. यामध्ये जनतेचे नुकसान होत.माझं स्पष्ट म्हणणं आहे कोणताही विरोधक जेव्हा त्या भागातील, त्या शहरातील प्रश्न सत्ताधारी किंवा प्रशासनासमोर मांडत असतो, तेव्हा त्या प्रश्नाकडे राजकारणा पलीकडे जाऊन समाजाचं हित या दृष्टीने पाहिलं पाहिजे. कुणी कोणत्या प्रश्नावर ते आवाज उठवला आणि कुणी तो प्रश्न सोडवला यापेक्षा नागरिकांचा प्रश्न सुटणे गरजेचे आहे. दिव्यातील समस्या न सुटण्याचं कारण तत्कालीन सत्ताधारी आणि प्रशासनाने केलेले दुर्लक्ष हेच आहे.दिव्यातून मूलभूत प्रश्न जर आपण पाहिले तर आजही पाणीटंचाई हा येथील मोठा प्रश्न आहे.या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.पाणीपुरवठ्याचे नियोजन होणे गरजेचे आहे.पालिका अधिकारी आणि संबंधित यंत्रणेने अनेकवेळा आश्वासन देऊन सुद्धा आजही नागरिकांना पुरेसा पाणी मिळत नाही. काही ठिकाणी भाजपच्या आंदोलनानंतर पाणी प्रश्न सुटलेला पाहायला मिळतो. ज्या ठिकाणी काहीच नव्हतं त्या ठिकाणी किमान पाणीपुरवठा व्हायला लागलाय.पण यात बदल होणं गरजेचं आहे. सरसकट सर्वच नागरिकांना दिलासा देण्यासाठी दूरगामी यंत्रणा राबवणे गरजेचे आहे. जे प्लॅन कागदावर आहेत ते प्रत्यक्ष उतरणे गरजेचे आहे. केवळ सिमेंटचे कॉँक्रीटचे रस्ते केले म्हणजे ह्या शहराचा विकास होणार आहे का? येथील आरोग्य व्यवस्था सुधारली गेली पाहिजे, हे कित्येक वर्षापासून आम्ही सांगत आहोत. दिव्यामध्ये महिलांसाठी स्वतंत्र बालमाता रुग्णालय असावं अशी आमची मागणी अनेक वर्षांपासून आहे.मात्र त्याकडे दुर्लक्ष होते याचा त्रास येथील लाखो महिलांना होतोय.इथे सुसज्ज रुग्णालय नसल्याने सामान्य नागरिकांना डोंबिवली ठाणे मुंबई या शहरांवर ते अवलंबून राहावं लागतं हे दुर्दैव आहे.एका मोठ्या महानगरपालिकेचा भाग असणारा दिवा शहरात आजही सार्वजनिक रुग्णालय नाही ही दुर्दैवी गोष्ट आहे. त्याचबरोबर येथील फेरीवाला धोरण राबवणे गरजेचे आहे.पार्किंगची समस्या गंभीर आहे. वाहतुकीचे नियमन होणे गरजेचे आहे. कोणत्याच बाबतीमध्ये दिवा शहरात पालिकेचे अस्तित्व जाणवत नाही फक्त कर आकारणी इतपतच दिवा शहरात पालिका अस्तित्वात दिसते.मात्र सोयी सुविधांच्या बाबतीमध्ये आजही महानगरपालिकेचे अस्तित्व या ठिकाणी दिसत नाही. नागरिकांना महानगरपालिकेत आपण राहतोय असं वाटत नाही, ते तसं वाटाव यासाठी महानगरपालिकेने स्वतः पुढाकार घेऊन दिव्यात सकारात्मक उपक्रम राबवायला हवेत. महापालिका आपलीशी वाटावी यासाठी ज्या सुविधा ठाणे शहरात दिल्या जातात तशा सुविधा दिवा शहरात दिल्या पाहिजेत.इथे कोणतेही राजकारण न करता नागरिकांचे प्रश्न सुटले पाहिजेत ही एक समाजसेविका म्हणून, एक नागरिक म्हणून या शहरातील एक राजकीय पक्षाची पदाधिकारी म्हणून माझी मागणी, भूमिका आहे. दिवा शहराच्या विकासासाठी माझा लढा सुरू आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**


सकारात्मक पत्रकारिता जपणारे,
दिवा शहरातील विविध समस्यांना
वाचा फोडणारे वर्तमानपत्र
दिवा न्यूज
दिशादर्शक, मार्गदर्शक!
वर्धापन दिन निमित्त
आणि गणेशोत्सव निमित्त
हार्दिक शुभेच्छा!
ज्योती राजकांत पाटील
अध्यक्षा, महिला मोर्चा
भारतीय जनता पार्टी ,दिवा शहर
अध्यक्षा-तन्वी फौंडेशन
रोहिदास मुंडे
अध्यक्ष, दिवा शहर मंडळ,
भाजपा


दिवा शहरातील पहिले वर्तमानपत्र,
शहरातील विविध समस्यांना
वाचा फोडणारे वर्तमानपत्र
वर्ष १ले
दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज ला
वर्धापन दिन निमित्त
आणि
गणेशोत्सव निमित्त
हार्दिक शुभेच्छा
निलेश पाटील
समाजसेवक
अर्चना पाटील,
समाजसेविका
शिवसेना दिवा शहर

# दिव्यातील नागरिकांना शहरात बदल झालेला दिसतोय,शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय!



– रमाकांत मढवी
माजी उपमहापौर, ठामपा
शिवसेना शहरप्रमुख,दिवा

आपण जर तुलनाच करायची म्हटली तर पाच वर्षांपूर्वीचा दिवा आज झपाट्याने बदलला आहे,विकसित होत आहे.सर्वच प्रश्न सुटले आहेत असा दावा आम्ही करणार नाही, मात्र दिव्यातील नागरिकांना शहरात बदल झालेला दिसतोय,लोकं स्वतः सांगत आहेत की कामे होत आहेत हेच आमच्या सेवेची पोचपावती आहे.

लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना दिवा शहराच्या प्रमुख समस्या असणाऱ्या रस्ते, गटारे,नाले आणि पाणी समस्या यांवर प्रामाणिकपणे काम मागील पाच वर्षात आम्ही केलं.

मागील पाच वर्षात दिवा शहराच्या मूलभूत प्रश्नांकडे नियोजन पध्दतीने मात कशी करता येईल त्या दृष्टीने उपाययोजना करण्याचा प्रयत्न आम्ही केला.दिवा हा काही एखादा वॉर्ड नाही हे एक शहर आहे. जिथे लोकसंख्या ही वाढती आहे. अनेक समस्या असताना जेव्हा आम्हाला येथील जनतेने एकहाती सत्ता दिली तेव्हा दिवा शहराच्या विकासाची खऱ्या अर्थाने मुहूर्त मेढ रोवली गेली.

जेव्हा २०१७ साली निवडून आलो तेव्हा प्रश्न तर शहरात अनेक होते, सुरवात करायची कुठून हा प्रश्न होता.पालिकेतील अनुभवी अधिकारी, आमचे महापौर आणि नेते यांच्या सहकार्याने दिव्यासाठी स्वतंत्र हेड निर्माण करून त्या माध्यमातून शहराच्या विकासाची पायाभरणी आम्ही केली.याचाच परिणाम म्हणून काही आमूलाग्र बदल आपल्याला पहायला मिळत आहेत.

दिवा शहर हे दलदलीच्या भागात वसलेले असल्याने पहिल्यांदा प्राधान्याने येथील रस्ते विकासाला चालना देणे गरजेचे होते. तुम्ही जर आज पाहिलेत तर मुख्य रस्ते,अंतर्गत रस्ते,पायवाटा, अनेक इमारतींच्या मधला पॅसेज काँक्रीटीकरण करणे अशी कितीतरी कामे तुम्हाला झालेली पहायला मिळतील.

आमच्या प्रभाग क्रमांक २७ व २८ मधील सर्वच नगरसेवकांनी लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी खऱ्या अर्थाने मागील ५ वर्षात मेहनत घेतली. अजून अनेक प्रश्न सोडवून येथील जनतेला अधिक दिलासा कसा देता येईल यादृष्टीने आम्ही पाठपुरावा करत आहोत.

आमचे नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिवा शहरातील प्रश्न नीट समजून घेऊन आम्हाला शासकीय स्तरावर मोठे सहकार्य केले.पाणी प्रश्न सोडवण्यासाठी दिवा शहराला भरीव निधीची तरतूद करण्यात आली. दिवा शहराला वाढीव पाणी पुरवठा सुरू झाला आहे.पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी कामे सुरू आहेत.सर्व कामे पूर्ण झाली की येथील पाणी प्रश्न देखील कायमचा सुटेल.इतक्या वर्षांचा प्रश्न लगेच सुटेल असे नाही ,मात्र ज्या पद्धतीने पाणी प्रश्नावर काम सुरू आहे ते पाहता येत्या काही महिन्यात हा प्रश्न पूर्णपणे संपलेला असेल.

आज अनेक भागातील पाणीपुरवठा सुरळीत झालेला आहे.पाणी पुरावठ्या मधील असमानता दूर करण्याचे काम आम्ही करत आहोत.काही भागात आजही प्रश्न आहे मात्र तो सोडवणे हे आमचे कर्तव्य आहे याची जाणीव आम्हाला आहे.

दिवा शहराच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न आम्ही पाहिले आहे.केवळ निवडणुका जिंकणे हा माझा उद्देश नसून दिवा एक आदर्श शहर म्हणून निर्माण झाले पाहिजे ही भूमिका आहे.

●●●

## वाहतूक पोलीस नेमण्याची गरज

दिवा शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शहरातील वाहनांची संख्या सुद्धा वाढली आहे. दिवा शहरात अन्य शहरात जाण्यासाठी बस सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांना त्याचा मोठा फायदा झाला आहे. मात्र अंतर्गत बस सेवा नसल्याने रिक्षा वाहतूक हाच महत्त्वाचा पर्याय आहे. दिवा स्टेशन परिसरामध्ये निमुळते रस्ते असल्याने व वेगवेगळ्या भागात जाण्यासाठी स्वतंत्र रिक्षा स्टॅन्ड नसल्याने वाहतुकीचे नियमन व नियोजन होत नाही. याचा परिणाम ट्रॅफिक आणि गर्दी होण्यावर होतो . दिवा रेल्वे स्टेशन पूर्व भागामध्ये सकाळी कामाच्या वेळेत व संध्याकाळी वाहतुकीची प्रचंड कोंडी होते. रिक्षा व इतर वाहने प्रचंड गर्दीमध्ये अडकून राहतात. सायंकाळच्या वेळा होणारी गर्दी व वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक विभाग व पालिकेने एकत्र येत याबाबत योग्य ती कारवाई करणे गरजेचे आहे. या ठिकाणी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक चौकी कायमस्वरूपी असणे गरजेचे आहे. सध्याच्या घडीला ,गर्दीच्या वेळी दिवा पूर्व स्टेशन परिसरात वाहतूक पोलिसांची अत्यंत आवश्यकता आहे.प्रशासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

– मनोहर परब
धर्मवीर नगर, दिवा






# शिंदे साहेबांच्या माध्यमातून दिव्याच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद



**– शैलेश पाटील**
माजी नगरसेवक
उपशहर प्रमुख, दिवा शिवसेना

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या माध्यमातून दिवा शहराच्या विकासासाठी मागील पाच वर्षात भरीव निधीची तरतूद करण्यात आली. खासदार श्रीकांत शिंदे यांनी पुढाकार घेतल्याने दिव्यातील अनेक प्रश्न महापालिका, राज्य सरकार यांच्या माध्यमातून सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न झाले.

दिवा शहराच्या बाबतीत म्हणायचं झालं तर रस्ते विकास,पाणी प्रश्न, रेल्वेच्या समस्या,रेल्वे ओव्हर ब्रिज यासारखे महत्त्वाचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. शिवसेनेच्या दिव्यातील सर्व नगरसेवकांनी शहर विकासाचे काम मागील पाच वर्षात केलं.दिवा शहरात अजूनही नागरी सुविधा पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे,यात दुमत नाही. अधिक चांगल्या सुविधा येथील नागरिकांना कशा उपलब्ध होतील त्यासाठी आमचा पाठपुरावा आणि प्रयत्न सुरू आहे. येणाऱ्या काळामध्ये दिवा शहर हे अतिशय नियोजन पद्धतीने विकसित केलं जाईल. एकीकडे दिव्याचा विकास शासकीय पातळीवरील विविध योजनांच्या माध्यमातून होत असताना येथील स्थानिक नागरिकांनी सुद्धा आपली जबाबदारी म्हणून काही नागरि कर्तव्य पार पाडायला हवीत. आपलं शहर स्वच्छ ठेवण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घ्यायला हवा.पालिकेला सहकार्य करायला हवे.येणाऱ्या काळामध्ये दिवा शहरात विकासाची अनेक कामे होणार आहेत. ही कामे चांगल्या पद्धतीने करून घेण्याचा आमचा प्रयत्न राहील. पाणी प्रश्न पूर्णतः सोडवण्याकडे आमचं विशेष लक्ष राहील.

●●●

# प्रभागातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य



**– निलेश पाटील**
दिवा शिवसेना

खासदार श्रीकांत शिंदे, दिवा शहर प्रमुख रमाकांत मढवी यांच्या माध्यमातून मला शिवसेनेचे काम करण्याची संधी मिळाली आहे.त्या संधीचं सोनं करत येथील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करत आहे. माझ्या कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या समस्या जाणून घेऊन त्या कशा सोडवता येतील याकडे आमचा कल असतो.आमच्या भागातील नागरिकांना जे प्रश्न प्राधान्याने भेडसावतात त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना कशा करता येतील या दृष्टीने आम्ही विचार करत असतो.येणाऱ्या काळात शिवसेनेच्या माध्यमातून आमचा संपूर्ण प्रभाग समस्या मुक्त करण्याकडे माझा कल असेल. या भागातील नागरिकांना चांगल्या सोयी सुविधा देण्याचा आमचा निर्धार आहे. दिवा शहरातील नागरिक हा नोकरदार वर्ग असून या वर्गाला मुंबई ठाण्यातील नागरिकांना ज्या सुविधा मिळतात त्या धर्तीवर सोयी सुविधा देण्याचा प्रयत्न आमचा या भागात असेल. शिवसेनेच्या माध्यमातून शहराचा विकास अतिशय चांगल्या पद्धतीने होत आहे. रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली दिवा शहरात विकासाची अनेक कामे झाली आहेत. हा विकासाचा रथ यापुढे असाच सुरू राहील. येणाऱ्या पाच वर्षात दिवा शहराचा कायापालट झालेला असेल याची खात्री मला आहे!

●●●




वर्ष १ले
वर्तमानपत्र ही समाजाचा आरसा आहेत...
निर्भीड, निपक्ष वर्तमानपत्र
दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
प्रथम वर्धापनदिन तसेच
गणेशोत्सव निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : केदार दिघे ठाणे जिल्हा प्रमुख, शिवसेना
शिवसेना ठाणे जिल्हा, पदाधिकारी व तमाम शिवसैनिक


# ठाणे शहराच्या विकासासाठी राजकीय नेतृत्व, धोरणात बदल करणे आवश्यक,सर्वसामान्य नागरिक केंद्रस्थानी असायला हवा




**- संजय घाडीगांवकर**
माजी गटनेता, ठाणे महापालिका

ठाणे शहराच्या विकासाची वाटचाल करताना हे शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे कसे बनेल या दृष्टीने उपाययोजना व्हायला हव्यात. मुंबईच्या लगत ठाणे शहर असून सुद्धा आजही येथील नागरिकांना त्या दर्जाच्या सुविधा उपलब्ध नाहीत ही वस्तुस्थिती आहे.याला जबाबदार येथील राजकिय इच्छाशक्तीची कमतरता आणि नेतृत्वाची उदासीनता आहे. मुंबई शहराच्या धरतीवर ठाणे शहरात विकासाची पायाभरणी व्हायला हवी असं माझं मत आहे. ठाणे महापालिकेने या शहराचा विकासाचे धोरण ठरवताना यापुढे सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी मानून काम करायला हवं. महापालिका क्षेत्रामध्ये आजही मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी भाग आहे.या भागाच्या आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी महापालिकेमार्फत कोणत्या उपाययोजना झाल्या?त्याचा विचार होणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय हे एकमेव सार्वजनिक रुग्णालय महापालिकेच्या माध्यमातून चालवलं जातं. या रुग्णालयात अत्यावश्यक आणि दर्जेदार सेवा सुविधा उपलब्ध व्हायला हव्यात अशी नागरिकांची अनेक वर्षापासूनची मागणी आहे. महापालिकेने त्याकडे लक्ष द्यायला हवं.अशा पद्धतीची अजून किमान दोन ते तीन रुग्णालये महापालिकेने ठाणे शहराच्या अन्य भागांमध्ये उभारणे गरजेचे आहे. शहराचा विस्तार होतोय लोकसंख्या वाढतेय आज शहर घोडबंदर पासून दिवा या भागापर्यंत वाढले आहे. त्या त्या भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी त्या त्या भागात सार्वजनिक रुग्णालय असणे गरजेचे आहे. महापालिकेचे ते कर्तव्य आहे. किसननगर ,वागले इस्टेट, कोपरी पाचपखाडी या भागातील नागरिकांसाठी सुद्धा महापालिकेने स्वतंत्र महापालिका रुग्णालय उभारणे आवश्यक आहे. कचरा संकलन बाबत महापालिकेने स्वतःच धोरण ठरवून डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न कायमस्वरूपी निकालात काढणे आवश्यक आहे.मात्र गेल्या अनेक वर्षांमध्ये डम्पिंग ग्राउंड चा प्रश्न सोडवण्यास महापालिकेला अपयश आलेले आहे. डम्पिंगच्या माध्यमातून राजकारण होणं हे महापालिकेसारख्या स्वायत्त संस्थेसाठी दुर्दैवाची गोष्ट आहे. पाणीपुरवठ्याबाबत ठोस धोरण आजही ठाणे महापालिकडे नाही. प्रत्येक निवडणूक महापालिकेची पाणी या प्रश्नावर होते याचा विचार महापालिकेने करायला पाहिजे. पाणी हा राजकारणाचा विषय न ठेवता तो नागरिकांच्या सोयी सुविधांचा विषय ठरयला हवा. नागरिकांना वेळेत पाणी मिळायला हवं ही भूमिका महापालिकेने ठेवायला हवी. अनेक प्रश्न आहेत, या प्रश्नांवरती महापालिकेने लक्ष द्यायला हवं. आरोग्य सुविधा, पाणी प्रश्न ,महापालिका शाळांचा शैक्षणिक सुधारणेचा प्रश्न, महापालिका शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण सुविधा उपलब्ध महापालिकेने केल्यास आज अनेक भागांमध्ये ज्या, अनधिकृत शाळा फोफावल्या आहेत त्या वाढणार नाहीत.गरीब विद्यार्थ्यांची, पालकांची फसवणूक होणार नाही. महापालिका शाळांकडे महापालिकेने लक्ष देणे गरजेचे आहे. ठाणे महापालिका ही नावाजलेली महापालिका असल्याने त्याच शैक्षणिक धोरण सुद्धा त्याच धर्तीवर असावं अशी माझी भूमिका आहे, ही मागणी मी वारंवार महापालिका प्रशासनाकडे केलेली आहे. त्याचबरोबर महापालिकेने कारभारामध्ये पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. जिथे पारदर्शकता नसते तिथे विकासाला खेळ बसते.माझी महापालिका प्रशासनाला विनंती आहे,की सर्वच प्रकारच्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता असायला हवी. ठाणे शहराचा विकास करायचा असेल तर नागरिकांचा थेट सहभाग हा महापालिका योजनांची ग्राउंड वर अंमलबजावणी करताना असायला हवा. तसे धोरण ठरवायला हवं ही माझी भूमिका आहे!

●●●




सकारात्मक पत्रकारिता जपणारे,
दिवा शहरातील
विविध समस्यांना
वाचा फोडणारे
वर्तमानपत्र
वर्ष १ले
दिवा न्यूज दिशादर्शक, मार्गदर्शक! ला
वर्धापन दिन निमित्त
आणि
गणेशोत्सव निमित्त
हार्दिक शुभेच्छा
कैलाश भगत
समाजसेवक, दिवा

# दिवा शहरासाठी निधी येतो तो खर्च कुठे होतो हे नागरिकांना कळणे गरजेचे, निकृष्ट कामांना आळा बसायला हवा




–रोहिदास मुंडे
अध्यक्ष
दिवा शहर, भाजपा

मागील पाच वर्षात दिवा शहरासाठी मोठ्या प्रमाणात महापालिकेमार्फत निधी मंजूर झाला. हा निधी दिव्यात आल्याच्या वेळोवेळी बातम्या प्रसिद्ध झाल्या.आजही दिवा शहरासाठी शासनाने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे.काही ठिकाणी मुख्य रस्त्याची काम झाली, त्या कामांचा दर्जा हा निकृष्ट दर्जाचा आहे हे पाहिल्यानंतर लक्षात येते. मोठ्या प्रमाणात निधी येऊनही दिवा शहराच्या विकासाच्या दृष्टीने त्याचा कितपत फायदा झाला यावर अभ्यास होणे गरजेचे आहे.दिवा शहरात मागील पाच वर्षात जो निधी खर्च करण्यात आला त्याचे जर ऑडिट केलं तर नेमका कोणत्या कामांवर किती खर्च झाला हे जनतेसमोर येईल. पाच वर्षांपूर्वी झालेला मुंब्रा देवी कॉलनी रोड आज खराब झाला आहे. दिवा आगासन रोडचा कॉंक्रिटीकरण निकृष्ट दर्जाचा आहे. ही स्थिती साबे गावातील रस्त्याबाबत आहे. त्यामुळे होणारी कामे ही दर्जेदार होणार नसतील तर आता दिसणारा विकास हा पुढच्या पाच वर्षात भकास झालेला पाहायला मिळेल. पुन्हा रस्ते करायचे पुन्हा काम घ्यायची हेच जर होणार असेल तर अन्य सुविधा नागरिकांना मिळणार कधी? हा प्रश्न आहे. प्रशासनाने कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता दिव्याच्या विकासाची ब्लू प्रिंट बनवायला हवी. त्या विकास आराखड्याच्या माध्यमातून दिव्यात काय काय सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करता येतील याकडे लक्ष द्यायला हवं. नुसतं क्लस्टरचे गाजर देऊन अजून दहा-बारा वर्ष त्या एका मुद्द्यावर काढता येणार नाहीत. नागरिक आज ज्या बिकट स्थितीत राहत आहेत त्या स्थितीत सुधारणा होणं आजच्या घडीला गरजेचे आहे. ड्रेनेजबाबत काय सुधारणा झालेल्या आहेत याकडे लक्ष द्यायला हवं. ड्रेनेज हा फार महत्त्वाचा आणि अतिशय गंभीर प्रश्न आजच्या घडीला दिव्यामध्ये आहे.आज ज्या चाळी, इमारती आहेत त्या जर पाहिल्या तर त्यांच्या आजूबाजूला कचरा आणि घाणीचे साम्राज्य, गटारांचं पाणी हे पाहायला मिळतं. त्यांच्या सांडपाण्याची व्यवस्था नीट झालेली नाही. याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. दिवा शहरात इमारतींचे आयुष्य वाढव असा जर प्रशासनाला वाटत असेल तर त्यासाठी हे गरजेच आहे. गटारांची बांधणी व्यवस्थित झालेली नाही. त्यामुळे पाण्याचा निचरा पावसाळ्यात होत नाही. मूलभूत समस्या सोडवण्यासाठी इंजिनीयर लोकांनी प्रत्यक्ष दिवा शहरात पाहणी दौरे करणे गरजेचे आहे. लोकप्रतिनिधी आणि नगरसेवकांच्या सांगण्यावरून जर काम होणार असतील तर ते तांत्रिकदृष्ट्या सक्षम होणार नाहीत,हे प्रशासनाने लक्षात घ्यावं. येणाऱ्या काळात या सुधारणा अपेक्षित आहेत.

●●●







वर्ष १ले
सकारात्मक पत्रकारिता जपणारे,
दिवा शहरातील विविध समस्यांना
वाचा फोडणारे वर्तमानपत्र
दिवा न्यूज ला
दिशादर्शक, मार्गदर्शक!
वर्धापन दिन निमित्त
आणि गणेशोत्सव निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : संजय भगत
समाजसेवक, दिवा

# संदीप माळवी ठरले देशातील सर्वात लोकप्रिय स्मार्ट सिटी सीईओ

**ठाणे:** स्मार्ट सिटीज कौन्सिल इंडियाच्यावतीने, केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी मिशन आणि महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या 'स्मार्ट अर्बनेशन' या परिषदेमध्ये ठाणे महानगरपालिकेच्या ठाणे स्मार्ट सिटी लि. ने मोबिलिटी सोल्यूशन या प्रकारात पुरस्कार मिळविला. तसेच देशातील १०० स्मार्ट सिटीज मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमधून देशातील सर्वात लोकप्रिय मुख्य कार्यकारी अधिकारी हा सन्मानाचा पुरस्कार ठाणे स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळवी यांना प्रदान करण्यात आला.

मुंबई येथील हॉटेल सहारा इंटरनॅशनल येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्मार्ट अर्बनेशन परिषदेत स्मार्ट सिटीज कौन्सिल इंडियाचे संस्थापक तथा कार्यकारी संचालक प्रताप पदोदे यांच्या शुभहस्ते आणि ऑस्ट्रेलियास्थित एलव्हीएक्स ग्लोबल या कंपनीचे चेअरमन कोरी ग्रे यांच्या उपस्थितीत हे पुरस्कार स्वीकारण्यात आले. यावेळी महाराष्ट्रासह देशातील इतर स्मार्ट सिटीजचे सीईओज, वरिष्ठ अधिकारी, विविध प्रकल्प सल्लागार आदी उपस्थित होते.

प्रारंभी नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये स्मार्ट सिटी मिशनतंर्गत महाराष्ट्राच्या कामगिरीचा धावता आढावा घेतला तसेच महाराष्ट्र सरकारच्यावचीने सुरू असलेल्या महत्वाकांक्षी प्रकल्पांची माहिती सांगितली.

ठाणे शहरामध्ये केंद्र सरकार, राज्य शासन आणि ठाणे महापालिकेच्यावतीने ठाणे स्मार्ट सिटीच्या माध्यमातून विविध प्रकल्पांचे काम सुरू आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकल्पांचे काम सुरू आहे.

स्मार्ट सिटीज कौन्सील इंडिया ही संस्था केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटीज मिशनसोबत काम करीत असून या संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी स्मार्ट सिटी विशेष प्रकल्प पुकस्कार देण्यात येतात. यावेळी सन २०२२ सालच्या विविध प्रकल्पातंर्गत ठाणे स्मार्ट सिटीला 'मोबिलिटी सोल्यूशन्स' या प्रकारात प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दरम्यान स्मार्ट सिटीज कौन्सिल इंडियाच्यावतीने १०० स्मार्ट सिटीजमधून देशातील सर्वाधिक लोकप्रिय मुख्य कार्यकारी अधिकारी या पुरस्काराने दरवर्षी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला सन्मानित करण्यात येते. ऑनलाईन मतदानाच्या माध्यमातून या पुरस्काराची निवड केली जाते. सन २०२२ चा देशातील सर्वात लोकरप्रिय मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ठाणे स्मार्ट सिटी लि. चे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळवी यांना सन्मानित करण्यात आले आहे.


## आदिवासी पाड्यातील नागरिकांसाठी विशेष आरोग्य केंद्र



## फिरत्या आरोग्य केंद्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

**ठाणे:** ठाणे महापालिका क्षेत्रात असणाऱ्या आदिवासी पाड्यांतील नागरिकांनी आरोग्याच्या प्राथमिक तसेच आवश्यक अत्याधुनिक सेवा सुविधा त्यांच्या राहत्या घराजवळच मिळविण्यात यासाठी ठामपा सार्वजनिक आरोग्य विभाग व आयसीआयसीआय फाउंडेशन यांच्या सहकार्याने नव्याने तयार करण्यात आलेल्या '' फिरत्या आरोग्य केंद्राचे '' लोकार्पण शुक्रवारी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

ठमपाच्यावतीने सर्व प्रभाग समिती मध्ये आरोग्य केंद्र तसेच महापालिकेच्या हॉस्पिटल्समध्ये नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. परंतु शहरातील काही आदिवासी पाड्यातील नागरिकांना आरोग्य केंद्रात येऊन उपचार घेणे शक्य नसते. याकरिता त्यांना त्यांच्या राहत्या घराजवळच प्राथमिक तसेच आवश्यक अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करावी यावं उद्देशाने महापालिकेने आयसीआयसीआय फाउंडेशन यांच्या सहकार्याने नव्याने मोफत '' फिरत्या आरोग्य केंद्र '' तयार करण्यात आले. या फिरत्या आरोग्य केंद्रात प्रशिक्षित कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्यात आली असून यामध्ये डॉक्टर्स, नर्सेस, वॉर्डबॉय, सफाई कर्मचारी आदींचा समावेश आहे. आदिवासी पाड्यातील नागरिकांना प्राथमिक तसेच अत्यावश्यक सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये प्राथमिक तपासणी, औषधोपचार, लसीकरण, तसेच गरोदर महिलांची देखील तपासणी करण्यात येणार आहे. अत्याधुनिक मशीनद्वारे सुसज्ज असे हे फिरते आरोग्य केंद्र आहे. गरोदर महिलांना ये-जा करण्यासाठी देखील याचा वापर करण्यात येणार आहे. तसेच या फिरत्या आरोग्य केंद्राला संपर्क करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापक कक्षाचा टोल फ्री संपर्क क्रमांकाच्या आधारे संपर्क क्रमांक जोडण्यात येणार आहे. प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. यावेळी आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा, माजी स्थायी समिती सभापती संजय भोईर इतर माजी नगरसेवक, नगरसेविका, उपायुक्त मनीष जोशी आदी उपस्थित होते.




वर्ष १ले
शहरातील विविध समस्यांना
वाचा फोडणारे वर्तमानपत्र
दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज ला
प्रथम वर्धापनदिन तसेच
गणेशोत्सव निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : प्रशांत चौरे, उपअभियंता मुंब्रा प्रभाग समिती, ठामपा


वर्ष १ले
शहरातील विविध समस्यांना
वाचा फोडणारे वर्तमानपत्र
दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज ला
प्रथम वर्धापनदिन तसेच
गणेशोत्सव निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : कैलेश मनोहर पाटील समाजसेवक, दिवा

## ठाणे शहराचा नियोजनबद्ध विकास करायचा असेल तर...

# प्रत्येक प्रश्नावर बारकाईने आणि प्रामाणिकपणे काम करावं लागेल



– निलेश चव्हाण
उपाध्यक्ष – भाजप
ठाणे शहर (जिल्हा)

मुळात आपल्याकडे बहुतांश शहरं ही नियोजन करून वसवली जात नाहीत, ती आधी वसतात आणि नागरी सुविधांसाठी ओरड व्हायला लागली की, प्रशासनाकडून नागरी सुविधा पुरवण्याचे प्रयत्न होतात. ठाणे शहर हे त्यापैकी एक. याच शहरात मी लहानाचा मोठा झालो त्यामुळे ठाणे हे माझे सर्वात आवडतं शहर. मी लहान असताना ठाण्याची लोकसंख्या अगदीच मर्यादीत होती. इमारती होत्या पण २ ते ३ मजल्यांच्या, रस्त्यांवर फारशी गर्दीही नसायची, गाड्या मोजक्याच होत्या आणि सायकल चा वापर जास्त होता. छोट्या-मोठ्या कामांसाठी पायी जाण्याची सवय होती.पण आता मात्र परिस्थिती बदलली आहे. गगनचुंबी इमारतींबरोबरच अनधिकृत बांधकामं झाल्यामुळे शहराचे नियोजन करण्यास मर्यादा आल्या. पण तरीही ठाणे महानगरपालिका त्यातून मार्ग काढत शहराचा विकास करण्याचा प्रयत्न करतेय ही निश्चितच समाधानाची गोष्ट आहे. इतर महापालिकांच्या तुलनेत ठाणे महापालिकेचे काम उजवे आहे हे मान्य केले तरीही सध्या या शहरात काही गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी पहिली आहे वाहतूक. बघायला गेलं तर तीनचार प्रमुख रस्ते आहेत. एक म्हणजे, शहरातून जाणारा लाल बहादूर शास्त्री मार्ग जो शीळ फाट्या पर्यंत जातो, दुसरा पूर्व द्रुतगती महामार्ग जो शहरातून घोडबंदर पर्यंत जातो, तिसरा विटाव्या कडून कळवा पुलाकडे येणारा, चौथा भिवंडीकडून ठाण्यात येणारा, या सर्व रस्त्यांवर सकाळी आणि संध्याकाळी प्रचंड वाहतूक कोंडी होते. वाढलेली लोकसंख्या आणि प्रत्येक घरात दोन-चार गाड्या यामुळे रस्त्यावरचा ताण वाढला आहे.

एंट्री पॉइंटवर असलेले टोल, लेव्हलमध्ये नसलेले रस्ते, शहरात अवजड वाहनांना मुक्त वावर दिल्यामुळे रस्त्यांवर पडलेले मोठमोठे खड्डे, त्यात भर म्हणजे भरमसाठ बांधलेले स्पीड ब्रेकर आणि कुचकामी सिग्नल यंत्रणा त्यामुळे वाहतुकीचा पुरता बोजवारा उडाला असून अशा परिस्थितीत ठाणेकर जीव मुठीत धरून रोज प्रवास करत आहेत.

या सर्व समस्यांवर मात करायची असेल तर सर्वप्रथम एंट्री पॉईंट वरचे टोल हटवावे लागतील. नुकतीच तशी घोषणा केंद्रीय रस्ते आणि भूपृष्ठवहन मंत्री नितीनजी गडकरी यांनी केली आहे त्याचे स्वागत करताना लवकरात लवकर त्याची अंमलबजावणी झाली तर शहरांसाठी तो एक मोठा दिलासा असेल, कारण जकात नाके गेले आणि टोल नाके आले त्यामुळे एंट्री पॉईंटनी मोकळा श्वास कधी घेतलाच नाही. दुसरे महत्वाचे काम म्हणजे, एंट्री पॉईंट च्या आधीच अवजड वाहतूक शहराच्या बाहेरून वळविण्यासाठी रस्त्यांचे पर्याय तयार करावे लागतील. चांगले फुटपाथ, सायकल ट्रॅक, पादचाऱ्यांना पाहिजे तेंव्हा बटन दाबून पाहिजे तेंव्हा रस्ता क्रॉसिंग करण्याची अद्ययावत सिग्नल प्रणाली अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून काम करावे लागेल. काम टप्प्या-टप्प्याने झाले तरी चालेल पण संपूर्ण नियोजन मात्र आजच तयार असले पाहिजे तरच आपण चांगली शहरं उभी करू शकू.

पाणी, कचरा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, शाळा, मैदानं या विषयांकडेही गांभीर्याने पहावे लागणार आहे. दादोजी कोंडदेव मैदान सोडले तर ठाण्यात दुसरे मोठे मैदान नाही ही शहरासाठी खेदाची बाब आहे. हल्ली क्रिकेट च्या बरोबरीने मुलं फुटबॉल खेळतायत पण त्यांच्यासाठी फुटबॉल चे मैदान आपल्या शहरात नाही. चांगले आंतरराष्ट्रीय दर्जाचे फुटबॉलचे मैदान आपल्या शहरात असले पाहिजे.

आणि म्हणून मला वाटते की प्रश्न खूप आहेत, नियोजनाच्या बाबतीत आपण आज जरी खूप मागे पडलो असलो तरी, उद्भवणाऱ्या प्रत्येक प्रश्नावर जर आपण बारकाईने आणि प्रामाणिक उद्देश ठेऊन काम केले तर आपले ठाणे आपण अधिक सुंदर करू शकू. नुकतेच राज्यात सत्तांतर झाले असून ठाण्याला मा.एकनाथराव शिंदे यांच्या रूपात एक कार्यक्षम मुख्यमंत्री मिळाला आहे. ठाणे शहरासाठी ही मोठी भाग्याची गोष्ट आहे, त्यात जोडीला उप मुख्यमंत्री म्हणून मा.देंवेंद्रजी फडणवीस आहेत ज्यांनी मागच्या ५ वर्षात मुख्यमंत्री म्हणून, महाराष्ट्राच्या अनेक शहरांच्या विकासात महत्वाचे योगदान दिले आहे. अशी ही अनुभवसंपन्न जोडी सत्तेत असल्यामुळे ठाणे शहराचा नियोजनबद्ध विकास झपाट्याने होईल असा मला विश्वास आहे.

●●●



# घोडबंदर भागात पाणी समस्या लागणार मार्गी

## पालिका प्रशासनाचे बैठकीत आश्वासन



**ठाणे :** येथील घोडबंदर भागातील पाणी समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे लवकरच ही समस्या मार्गी लागले, असे आश्वासन महापालिका प्रशासनाने शुक्रवारी आमदार संजय केळकर यांना दिले आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वी विधानसभेत केळकर यांनी घोडबंदर भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी टंचाईच्या समस्येवर तोडगा काढण्याऐवजी ठाणे महापालिका टँकरमाफियांना पोसत असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर ठाणे महापालिकेत शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत केळकरांना आश्वासन दिल्यावर जर का तरी ही पाणी समस्या सुटली नाहीतर नागरिकांसह आंदोलन करण्याचाच इशाराही यावेळी दिला.

घोडबंदरच्या पाणी पुरवठ्याचा कृती आराखडा ठरविण्यासाठी महापालिकेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला आमदार केळकर यांच्यासह महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे उपनगर अभियंता विनोद पवार तसेच घोडबंदर भागातील नागरिक उपस्थित होते. ज्या भागात पाणी टंचाईची समस्या आहे, त्याठिकाणी मुबलक पाणी कसे उपलब्ध होईल. त्यासाठी जलवाहीन्या टाकणे, अतिरिक्त पाणी पुरवठा करणे, अशा उपाययोजना करण्याचे काम सुरु असून हे काम लवकरच पुर्ण होऊन या भागातील पाणी समस्या सुटेल, असे आश्वासन प्रशासनाने बैठकीत दिले.

# शिवसेनेच्या वतीने दिव्यातील गणेश भक्तांना गावी जाण्यासाठी मोफत बस सेवा

**दिवा:**–दिव्यातून गणेशोत्सव साठी गावी जाणाऱ्यांना मोफत बसेस उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार शिवसेनेने पुढाकार घेतला असून मोफत बसेस साठीचे पास माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या उपस्थितीत रविवारी नागरिकांना देण्यात आले.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या तर्फे दिवा विभागातून गावी जाणाऱ्या गणेश भक्तांना मोफत एस टी सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दिवा विभागात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून एकूण ८० बसेस देण्यात आल्या आहेत.रविवारी शिवसेना दिवा शहर प्रमुख,माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये गणेशोत्सव साठी गावी जाणाऱ्या नागरिकांना मोफत बसेस चे पास उपलब्ध करून देण्यात आले.यावेळी विभाग प्रमुख उमेश भगत,भालचंद्र भगत,माजी नगरसेवक अमर पाटील,दीपक जाधव,आदेश भगत,विनोद मढवी,दर्शना म्हात्रे,दीपाली भगत,अर्चना पाटील आदी मान्यवरांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दिव्यातून गणेशोत्सव साठी बसेस उपलब्ध करून दिल्याने नागरिकांनी मुख्यमंत्री व खासदार यांचे आभार मानले आहेत.



**भारतीय जनता पार्टी ठाणे शहर जिल्हाध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांच्या नेतृत्वाखाली दिवा मंडळ युवा अध्यक्ष सचिन भोईर याच्या माध्यमातून साबे गावातून गुरु पाटील व त्यांचे सहकारी,महिला यांनी भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला.**







सकारात्मक पत्रकारिता जपणारे,
दिवा शहरातील विविध समस्यांना
वाचा फोडणारे वर्तमानपत्र
दिवा न्यूज ला
दिशादर्शक, मार्गदर्शक!
वर्धापन दिन निमित्त
वर्ष १ले
आणि
गणेशोत्सव निमित्त
हार्दिक शुभेच्छा
रमाकांत मढवी
माजी उपमहापौर
शहरप्रमुख (शिवसेना, दिवा)